**आजचा शुभ विचार**

“"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!









मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-39 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thurseday 12 June 2025 ▪ PAGES 4 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ३९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. १२ जुन २०२५ ▪ पाने ४ ▪ ₹ ४ रुपये


## 14 जूनला शिवतीर्थावर येऊ नका; राज ठाकरे यांचे आवाहन

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
---------------------



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा १४ जून हा वाढदिवस. दरवर्षीप्रमाणे राज्यभरातून मनसैनिक या दिवशी मुंबईतील शिवतीर्थावर येऊन त्यांना शुभेच्छा देतात. मात्र यंदा ही परंपरा खंडित होणार आहे. राज ठाकरे यांनी स्वतः पत्राद्वारे मनसैनिकांना यावर्षी शिवतीर्थावर न येण्याचं आवाहन केलं आहे.

**मुंबईबाहेर जाणार असल्याचे स्पष्टीकरण**

या वर्षी १४ जून रोजी म्हणजेच वाढदिवसाच्या दिवशी ते सहकुटुंब मुंबईबाहेर जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले आहे. “मी वाढदिवस साजरा करणार नाहीये, किंवा काही विशेष कारण आहे असेही नाही. त्यामुळे कोणतेही वेगळे अर्थ काढू नयेत,” असेही त्यांनी नमूद केले आहे

**“तुमच्या भेटीला लवकरच येईन”**

राज ठाकरे यांनी आपल्या भावनिक पत्रात पुढे लिहिलं आहे की, “गेली अनेक वर्षं तुम्ही वाढदिवसाच्या दिवशी भेटायला याल, हे निश्चित असतं. प्रत्येकाच्या भेटीचं, शुभेच्छांचं आणि प्रेमाचं मी ऋण मानतो. यंदा तुमचं दर्शन घडणार नाही, याची खंत राहील. पण मी लवकरच तुम्हाला भेटायला येईन. महाराष्ट्र सैनिकांशी संवाद साधण्यासाठी आणि त्यांचं दर्शन घेण्यासाठी पुन्हा भेट निश्चित आहे.”

**'लोकोपयोगी कार्य करा'**

राज ठाकरे यांनी वाढदिवसाच्या दिवशी आपल्या भागात लोकोपयोगी कार्यक्रम राबवण्याचं आवाहन केलं आहे. “ तुमच्या भागात सामाजिक उपक्रम राबवले, तर तेच माझ्या वाढदिवसाचं खऱ्या अर्थाने औचित्य ठरेल, ” असं ते म्हणाले.“तुमचं आणि तुमच्या कुटुंबाचं रक्षण करा. आपण लवकरच भेटू, ” असा सकारात्मक संदेश देत त्यांनी पत्राचा शेवट केला आहे. राज ठाकरे यांचं हे आवाहन एका जबाबदार नेत्या नंआपल्या कार्यकर्त्यांप्रती असलेल्या आत्मीयतेचं आणि संवेदनशीलतेचं उदाहरण ठरतं.

## मराठा समाजाच्या एसईबीसी आरक्षणाला स्थगिती देण्यास मुंबई हायकोर्टाचा नकार

### प्रवेशाचा मार्ग मोकळा; पुढील सुनावणी १८ आणि १९ जुलैला

**ओम सोमवंशी**
**मुंबई प्रतिनिधी**
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------




मराठा आरक्षणासंदर्भात मुंबई उच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीत सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग (एसईबीसी) श्रेणीतील आरक्षणाला स्थगिती देण्यास नकार देण्यात आला आहे. त्यामुळे मराठा विद्यार्थ्यांना एसईबीसी प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे. आता पुढील सुनावणी १८ आणि १९ जुलैला होणार आहे. उच्च न्यायालयाने मराठा आरक्षणासंदर्भात दाखल केलेल्या याचिकांवर नव्याने सुनावणी सुरू केली आहे आणि या आरक्षणाच्या वैधतेवर निर्णय घेण्यासाठी एक नवीन खंडपीठ स्थापन केले आहे. राज्य सरकारने मराठा समाजाला एसईबीसी कायद्याअंतर्गत १० टक्के आरक्षण दिले होते. हे आरक्षण सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात देण्यात आले होते. मात्र या आरक्षणाच्या बाजूने आणि विरोधात दोन्ही न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयाने मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयाला मराठा आरक्षणावरील सर्व याचिकांवर सुनावणी घेण्याचे निर्देश दिले होते.आरक्षणाच्या विरोधातील याचिकांमुळे उच्च शिक्षणातील मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना आरक्षण देण्यात अडचण येत असल्याचे समोर आले होते. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या वैधतेबाबतची नव्याने सुनावणी आजपासून मुंबई उच्च न्यायालयात होत आहे. त्यामुळे मराठा आरक्षण वैध ठरणार की नाही याची फैसला आगामी काळात होणार आहे. दरम्यान आता उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती रवींद्र घुगे यांच्या नेतृत्वाखालील विशेष त्रिसदस्यीय पूर्णपीठ सुनावणी घेत आहे. सुरुवातीला प्रकरण अंतरिम दिलासासाठी घ्यायचं की अंतिम निर्णयासाठी यावर वकिल आणि न्यायमूर्ती यांच्यात युक्तीवाद सुरू झाला. यावेळी विरोधी वकिलांनी “जो पर्यंत तारीख होत नाही तो पर्यंत स्टे द्यावा असा युक्तिवाद केला. यानंतर “फायनल सुनावणीसाठी प्रकरण घेण्यात यावं” असा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला. मराठा आरक्षणाच्या सुनावणीबाबत बोलताना महाराष्ट्राचे महाधिवक्ता बिरेंद्र सराफ म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाला आधीच अंतरिम दिलासा आहे.मग पून्हा सुनावणी घेण्यात अर्थ नाही, आता अंतिम सुनावणीला सुरूवात करायला हवी. यानंतर न्यायमूर्तींनी म्हटले की, मराठा आरक्षणाच्या विरोधात अनेक याचिका आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र बसून विरोधकांची बाजू नेमकं कोणं मांडणार हे ठरवा. यावर विरोधी वकिल प्रदीप संचेती यांनी म्हटले की, प्रत्येक याचिकाकर्त्याने विविध विषय वाटून घेतले आहे. प्रत्येकाला आपलं मत मांडायचं आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपलं मत मांडण्याचा अधिकार द्यायला हवा. यानंतर न्यायाधीश घुगे यांनी मराठी आरक्षणाची पुढील सुनावणी १८ जुलैला ३ वाजता आणि १९ जूलै रोजी पूर्ण दिवस चालेल, अशी माहिती दिली. त्यानंतर १९ जुलैला पुढची तारीख जाहीर केली जाणार आहे

## महापूर टाळण्यासाठी जागतिक बँकेच्या माध्यमातून ३२०० कोटींचा प्रकल्पच ५०० कोटींच्या निविदा लवकरच – राजेश क्षीरसागर

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------



महापूर हानी टाळण्यासाठी जागतिक बँकेच्या माध्यमातून शासन ३२०० कोटींचा प्रकल्प राबवत आहे. यातील पहिल्या टप्प्यातील ५०० कोटींच्या कामाची निविदा लवकरच काढण्यात येईल, असे राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अधिकारी राजेश क्षीरसागर यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बैठक सभागृहात आयोजित पूरनियंत्रण प्रकल्प व विविध विकासकामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हाधिकारी अशोक काकडे, महानगरपालिका आयुक्त सत्यम गांधी, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रकाश गुरव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. आयटी सेक्टरला चालना देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे सांगून क्षीरसागर म्हणाले, येथील आयटी इंजिनियर क्षेत्रातील विद्यार्थ्यांना नोकरीसाठी बाहेर जावे लागते. सांगलीला आयटी क्षेत्र चांगल्या पध्दतीने विकसित करण्यासाठी प्रयत्न करू. आयटी कंपन्या येण्यासाठी प्रयत्न करावेत, त्यासाठी जागा निवडावी. यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. पर्यटनाला चालना देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत, त्यामुळे रोजगार उपलब्धता होईल. सौरऊर्जेवर उद्योगधंद्याना वीजपुरवठा यासाठी लवकरच धोरण आखत असल्याचे ते यावेळी म्हणाले. यावेळी त्यांनी ग्रीस्टॅक योजना, सौरऊर्जेव्दारे कृषिपंपाना वीजपुरवठा, केंद्र शासनाची एक जिल्हा एक निर्यात उत्पादन योजना, कृषी, पर्यटन अशा विविध क्षेत्रात विकास साधण्यासाठी करण्यात येत असलेले प्रयत्न, कोविड, पाणीपुरवठा व्यवस्था, नावीण्यपूर्ण योजनेतून करण्यात येत असलेली कामे, कोविड आदी विषयांचा सविस्तर आढावा घेतला. यावर जिल्हाधिकारी अशोक काकडे यांनी ग्रीस्टॅक योजना, पर्यटन, नावीण्यपूर्ण योजना अंतर्गत करण्यात येत असलेले प्रयत्न आदीबाबत सविस्तर माहिती देऊन जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने जिल्हा विकास आराखड्यात समावेश केलेल्या विविध बाबींबाबत माहिती दिली.

## धुळ्यात बँक कर्मचाऱ्यास ठाकरे गटाकडून मारहाण; मराठीचा अपमान केल्याची तक्रार, तिघांना अटक

**श्री. संजय बच्छाव**
**धुळे जिल्हा प्रतिनिधी**
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



मराठी भाषिक शिक्षिकेचा आणि मराठी भाषेचा अपमान केल्याप्रकरणी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतील कर्मचाऱ्याला मारहाण केल्या प्रकरणी शिवसेसैनिकांविरुध्द (उध्दव ठाकरे) गुन्हा दाखल झाला असून तीन जणांना अटक करण्यात आली आहे. महिला ग्राहकाला शिवीगाळ केल्याप्रकरणी त्याच बँकेच्या व्यवस्थापकासह दोन जणांविरोधातही गुन्हा दाखल झाला आहे. शहरातील प्रमोद नगरातील एसबीआय बँकेच्या शाखेत शिक्षिका पद्मा शिंदे (४३, रा. गोकुळ अपार्टमेंट, देवपूर) या गेल्या असता बँक कर्मचारी सदाशिव अजगे (३३, रा.जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर) यांनी अपमानास्पद वागणूक दिली. मराठी भाषेचा अपमान केल्याची तक्रार शिंदे यांनी ठाकरे गटाकडे केल्यावर जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख नरेंद्र परदेशी आणि महानगरप्रमुख धीरज पाटील यांच्यासह १२ ते १५ शिवसैनिक बँकेत दाखल झाले. त्यांनी अजगेला जाब विचारत त्याच्या कानशिलात लगावली. शिंदे यांची माफी मागण्यास सांगितले. यावेळी देवपूर पोलीसही बँकेत दाखल झाले. त्यांनी शिवसैनिकांना ताब्यात घेत पोलीस ठाण्यात नेले. अजगे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अतुल सोनवणे, नरेंद्र परदेशी, धीरज पाटील, पद्मा शिंदे यांच्यासह १५ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला. यानंतर सोनवणे, परदेशी, पाटील यांना अटक करण्यात आली.

**बँक व्यवस्थापकासह दोघांविरोधात गुन्हा**

शिक्षिका पद्मा शिंदे यांच्या तक्रारीवरुन स्टेट बँकेच्या प्रमोद नगर शाखेचे व्यवस्थापक अतुल गांधी आणि कर्मचारी सदाशिव अजगे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बँकेत व्यवहार करण्यासाठी गेले असता गोल्ड लोनचे पैसे उशिरा आल्याच्या कारणावरुन व्यवस्थापक गांधी आणि कर्मचारी अजगे यांनी शिवीगाळ करुन अपमानास्पद वागणूक दिल्याची तक्रार शिंदे यांनी पोलिसांकडे केली होती.

**बँक कर्मचार्यांचे कामबंद आंदोलन**

एसबीआय बँकेचे कर्मचारी सदाशिव अजगे यांना झालेल्या मारहाणप्रकरणी प्रमोद नगर बँक शाखेच्या कर्मचार्यांनी कामबंद आंदोलन केले. कर्मचार्यांनी काळ्याफीती लावून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आणि प्रमोद नगर शाखेसमोर निदर्शने केली. अधिकारी व कर्मचार्यांनी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांना निवेदन दिले. मारहाण करणार्यांविरोधात कठोर कारवाई करावी, अधिकारी व कर्मचार्यांच्या सुरक्षेसाठी कार्यक्षम यंत्रणा उभारावी, प्रमोद नगर शाखेसह संवेदनशील शाखांमध्ये बंदोबस्त व गस्त व्चवस्था करावी, जिल्हा पातळीवर बँकींग सुरक्षेसाठी एक विशेष समन्वय समिती स्थापन करावी, अशा मागण्या एसबीआय ऑफीसर्स असोसिएशनचे अध्यक्ष सचिन गांगुर्डे, दिनेश कौशिक, विनोद मराठे, ओम मराठे, सदाशिव अजगे, राजेंद्र चव्हाण, एस. पी. शिंपी, शफीक पिंजारी यांनी केल्या

## बांग्लादेशातून आली, बनावट आधारकार्ड बनवलं आणि मतदानही केलं; नाशिक पोलिसांनी केलं जेरबंद !

**शैलेश रौंदळ**
**नाशिक प्रतिनिधी**
दैनिक स्वराज्यदूत
------------------------

नाशिक शहरात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या तीन बांग्लादेशी नागरिकांसह एका स्थानिक तरुणावर मुंबई नाका पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई नाशिक शहर पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दिनांक ८ जून २०२५ रोजी पोलीस आयुक्तांना खात्रीशीर गोपनीय माहिती मिळाली होती की, नाशिकमध्ये एक बांग्लादेशी महिला एका पुरुषासोबत राहत आहे. यानंतर तात्काळ कारवाईसाठी पोलीस उपआयुक्त (गुन्हे व विशेष शाखा) प्रशांत बच्छाव व सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांनी गुन्हे शाखा युनिट क्र. २ च्या पथकाला सूचना दिल्या. प्रभारी अधिकारी हेमंत तोडकर, सहायक पोलीस निरीक्षक डॉ. समाधान हिरे आणि प्रवीण माळी यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि माहितीच्या आधारे छापा टाकून संबंधित महिला आणि तिच्या जोडीदारास ताब्यात घेतले. चौकशीत सदर महिलेला आरोपी पुरुषाने आपली पत्नी असल्याचे सांगितले आणि ती बांग्लादेशी असल्याचे मान्य केले. पोलिस तपासात धक्कादायक माहिती पुढे आली आहे. संबंधित महिला २०१७ साली मामाच्या मदतीने पहिल्यांदा भारतात आली होती आणि नवी मुंबईतील घनसोली येथे वास्तव्यास होती. फेसबुकवरून ओळख झालेल्या नाशिकच्या पुरुषासोबत प्रेमसंबंधात आल्यावर ती परत बांग्लादेशात गेली होती. तेव्हा ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले आणि ६ जुलै २०१८ रोजी तिने एका मुलीला जन्म दिला. त्यानंतर ती पुन्हा मुलीसह २०१८ मध्ये बेकायदेशीरपणे भारतात परतली. या काळात ती आणि संबंधित पुरुष 'लिव्ह-इन' नात्यात राहत होते. नंतर ती पुन्हा बांग्लादेशात गेली आणि २०१९ मध्ये अधिकृत पासपोर्ट व टुरिस्ट व्हिसावर भारतात आली. मात्र व्हिसा संपल्यानंतरही ती भारतातच थांबली आणि स्वतःचा पासपोर्ट फाडून टाकला.

२०२२ मध्ये आरोपी पुरुषाने बांग्लादेशात जाऊन धर्म व नाव बदलून तिच्याशी निकाह केला. त्यानंतर ही महिला पुन्हा अवैधरित्या भारतात आली आणि सध्या नाशिकमध्ये राहत होती. सदर महिलेसोबत तिची मुलगीही होती. या दोघांनी संगनमताने मुलीचा बनावट जन्म दाखला, तसेच महिलेचे बनावट आधारकार्ड, मतदान ओळखपत्र व पॅनकार्ड तयार केले. विशेष म्हणजे, या महिलेने भारतात मतदान केल्याची कबुली देखील पोलिसांसमोर दिली आहे. या महिलेचा मामा आणि मामी यांनाही पुणे ग्रामीणच्या शिक्रापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून अटक करण्यात आली आहे. ते देखील भारतात बेकायदेशीरपणे राहत होते आणि त्यांनी सुरुवातीस तिला आश्रय दिला होता. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता, पासपोर्ट नियम, परकीय नागरिक कायदा व परकीय नागरिक आदेश यांच्याअंतर्गत गुन्हा क्रमांक १९८/२०२५ दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

सम्पादकीय

# जलामृत की विषामृत?

वायू सजीव सृष्टीसाठी प्राण आहे तसेच जल हे सुद्धा मुख्य तत्त्व आहे. संस्कृतमध्ये आप म्हणजे पाणी. वेदांमध्ये पाण्याला दिव्य म्हटले जाते. जे शांती, आनंद, संपत्ती, दीर्घायुष्य आणि चांगले आरोग्य आणते असे मानले जाते. औषधी गुण तत्त्वांमुळे त्याला 'अमृत' म्हणतात. आपल्या यजुर्वेदामध्ये सुद्धा जल हे सर्व रोगांवरचे औषध दिले आहे.

**" शुद्धा न आपस्तन्वे क्षरन्तु' ।** म्हणजे जलाची शुद्धता ही आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक आहे. पुराणानुसार पूजेचे साहित्य नद्यांमध्ये विसर्जन करणे, अस्थी विसर्जन करणे, पाण्यात थुंकणे, मूत्रविसर्जित करणे... हे सर्व जलाचा अपमान आणि पाप करण्यामध्ये येते. वैदिक परंपरेनुसार जलसंवर्धन करणे फार आवश्यक आहे. जल हे प्रत्येकाच्या जीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. परमेश्वराने या सजीव सृष्टीसाठी पालक म्हणून परिपूर्ण व्यवस्था केली आहे. पंचतत्त्वांव्यतिरिक्त वृक्ष-वनसंपत्ती सर्व काही दिले आहे. या अद्भुत शक्तीने आपल्यासाठी हे अमृतमय जल स्रोत नद्या, सागर, तलाव, झरे यातून सर्व घटकांपर्यंत पोहोचवले आहे. ऋतुचक्र योग्यरीत्या चालते, तेथून आपल्याला जल हे पावसाच्या माध्यमातून मिळते.

युगानुयुगे मानवाच्या प्रवृत्तीत जसजसा बदल होत गेला तसतसे पर्यावरण कमकुवत होत चालले. सांडपाणी, औद्योगिक कचरा, शेतीतील रसायने, प्लास्टिक, तेल गळती अशी जलप्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. मूळ औद्योगिक क्रांतीमुळे आपण जल विषमय करत आहोत. जल प्रदूषण अनेक कारणांमुळे होते, ज्यात नैसर्गिक आणि मानवनिर्मित घटक समाविष्ट आहेत.

जगात १,५०,००० पेक्षा जास्त नद्या आहेत. नाईल, अॅमेझॉन, मिसिसिपी, यांगत्झी सारख्या प्रमुख नद्या आहेत. भारतात जवळजवळ ४०० पेक्षा अधिक नद्या होत्या त्यातील प्रमुख १२ नद्या आहेत. यातील ब्रह्मपुत्र, गंगा, नर्मदा, सरस्वती, इंडस, ओहायो, मेघना, युना अशा अनेक नद्या आता आटल्या आहेत. या नद्या आटण्याचे मुख्य कारण म्हणजे धरणे आणि अनेक पर्यावरण हानिपूरक योजना. महाराष्ट्रातील ५५ नद्या या सर्वाधिक प्रदूषित असून भारतातील दिल्ली जवळील यमुना, पाकिस्तानातील रावी आणि इतर देशातील नैरोबी, थेम्स, पाझ, नायजर आणि नाईल, येलो, आर्टेमिस, अशा अनेक नद्या आहेत. प्रशांत, अटलांटिक, दक्षिणी, आर्कटिक, हिंद हे प्रमुख पाच महासागर आहेत. शिवाय अजून पन्नास समुद्र सुद्धा आहेत. आपण समुद्र सुद्धा प्रदूषित करत आहोत. प्लास्टिक, औद्योगिक नद्यांमधील कचरा समुद्रात सोडून दिल्यामुळे समुद्राच्या गुणवत्तेला नुकसान झाले आहे.

ज्याचा परिणाम मानवी आणि जलचर आरोग्यावर होत आहे. जगामध्ये कचरा आणि सांडपाणी यामुळे सर्व नद्यातील परिसंस्थेचा नाश झाला आहे. नद्या, समुद्र या सर्वाचे जल हे प्रदूषित झाल्यामुळे पर्यावरणीयदृष्ट्या खालचे पात्र हे मृत झाले आहे म्हणजेच ऑक्सिजनची पातळी ही २० टक्क्यानी कमी झाली आहे. औद्योगिक क्रियाकलापांमुळे येथील जीव जीवाणूंसाठी असणारे पोषक घटक तत्त्व (सशक्त गाळ) विषारी झाल्यामुळे येथील जीवसृष्टी नामशेष होत चालली आहे. समुद्रातील ध्वनी उदाहरणार्थ तेल ड्रिलिंग, समुद्री परिवहन, समुद्रावर टाकण्यात येणारी प्रकाश योजना ज्यामुळे प्राकृतिक घटकांना त्यांच्या जीवनचर्येत बाधा उत्पन्न करत असून उष्णता वाढल्यामुळे येथील समुद्री जीवांना गंभीर नुकसान होत आहे. या जलप्रदूषणामुळे आमांश, अतिसार हेपेटाइटिस ए, कॉलरा, टायफॉइड, पोलिओ, प्रजनन संस्थेवर परिणाम, कर्करोग आणि घातक रासायनिक द्रव्यांमुळे शरीरातील इतर अवयवांवर होणारे परिणाम अशा अनेक गंभीर आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

आता जगभरात साधारणत: २५% लोकसंख्येला सुद्धा पिण्याचे शुद्ध पाणी मिळू शकत नाही. पाण्याच्या शुद्धीकरणासाठी क्लोरीनचा वापर करावा लागतो पण महत्त्वाचे म्हणजे क्लोरीनमुळे जंतू मरतच नाही. WHO नुसार जगभरात कमीत कमी दोन अब्ज लोक हे प्रदूषित जल पितात, तर दिवसातून फक्त अतिसारामुळेच अंदाजे १००० मुलांचा तरी मृत्यू होतो. माझ्या मते या सजीव सृष्टीतील अनेक घटक या प्रदूषणामुळे नामशेष झाले आहेत, ज्याची आपण मोजणी करू शकतच नाही आणि मानवाची सुद्धा. १९७४ मध्ये "वॉटर ॲक्ट" स्थापित केला होता त्यानुसार अनेक मंडळांची स्थापना करून कडक कायदे जलप्रदूषण करणाऱ्यांवर आणि जल प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण यावर केले गेले. १९८८ मध्ये पर्यावरण संरक्षणासाठी यात अजून सुधारणा करण्यात आली. प्रदूषणामुळे सुरुवात तर ऋतुचक्र बदलाने झालीच आहे, पण भवितव्यात सजीव सृष्टीसाठी असणाऱ्या गरजाचं काय? बदलणारा निसर्ग आपल्याला सारखा सावध करतोय. भविष्यात सांगितल्याप्रमाणे तिसरे महायुद्ध झाल्यानंतर सुरुवात ही जल संकटाने होणार आहे. ऋतुचक्र-वनस्पती ते सर्व सजीव, निर्जीव घटक या सर्वांसाठी जल ही संजीवनी आहे; परंतु मानवाने त्याच्या क्रूर आणि घातकीपणामुळे या जलदेवतेला विषमय करून टाकले आणि ही संजीवनी मृत्यून्त झाली. चारही बाजूंनी समुद्राने घेरलेल्या मुंबईसारख्या बेटाला सुद्धा या जल प्रदूषणाचा फटका जोरदार बसणार आहे. कारण आपण पराकोटीचे प्रदूषण करत आहोतच; परंतु समुद्राला आत ढकलण्याचा जो काही विडा उचलला आहे त्यात एक दिवस हा समुद्र या बेटाला गिळंकृत करेल. निसर्गातील प्रत्येक घटक हा विचारपूर्वक आणि संतुलित केला गेला आहे. त्यात ढवळाढवळ केल्यास प्रकृती कधीही सहन करणार नाही. या मानवी क्रुरकर्मामुळे या सजीव सृष्टीतील एकही घटक जिवंत राहू शकणार नाही. कितीही प्रयत्न केला तरी अमृतमय जल विषमय होऊन जाईल आणि विष सुद्धा प्यायला मिळणार नाही ! आता तरी या परिपूर्ण मानव घटकाने तिच्या संरक्षणात्मक कार्य करावे म्हणजे जलसंतुलन होऊ शकते आणि तरच ही जलदेवता तुम्हाला म्हणजे सर्व सजीव सृष्टीला कायम सुखमय आणि आनंदमय ठेवू शकते.

# स्थानिक स्वराज्याचा निवडणुकीसाठी तयार रहा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आदेशाची पदाधिकारी अंमलबजावणी करा .. आमदार इद्रीस भाई नायकवडी

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी च्या २६ वर्धापनदिन पुणे येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली वर्धापनदिन उत्साहात संपन्न झाला.यावेळी महाराष्ट्रातील हजारांच्या संख्येने जेष्ठ नेते मंडळी पदाधिकारी उपस्थितीत होते.

यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आदेश केले की होणाऱ्या स्थानिक स्वराज्याचा महानगरपालिका.नगर पालिका.नगर पंचायत. जिल्हा परिषद.पंचायत समिती चा निवडणूकीसाठी तयार रहा यासाठी अल्पसंख्याक समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आदेशाची अंमलबजावणी करुन तयारी लागा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी चे अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार ईद्रीस भाई नायकवडी यांनी केले आहे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या २६ व्या वर्धापनदिन पुण्यातील बालेवाडी क्रिडा संकुलात साजरा करण्यात आला यावेळी मार्गदर्शन करतांना अजीतदादा पवार यांनी सांगितले की दिनांक १० जुन १९९९ ला राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ची स्थापना झाली तेव्हा राजपर्यत महाराष्ट्रातील लोकांची कामे केली आहेत सर्व समाजाला सोबत घेऊन काम केली आहे आणि करणार आहेत पक्ष शिव.शाहु फुले. आंबेडकर .याच्या विचाराने चालणारा पक्ष आहे सता येईल जाईल.पण पुरोगामी विचार जिवंत राहिले पाहिजेत आपल्या सगळ्यांचा अधिकारांचे रक्षण होणे गरजेचे आहे. विचारांची कधीही तडजोड केली जाणार नाही. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाण्याची क्षमता असेल त्यालाच राष्ट्रवादी कॉंग्रेस संधी देणार आहे.राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ला कट्टर धर्म वाद मान्य नाही.आणि भाविषसात असणार नाही. शोषित. वंचित. मागासवर्गीय तसेच अल्पसंख्याक समाजासाठी काम करणारा. राष्ट्रवादी पक्ष राहीला आहे. स्थानिक स्वराज्याचा महानगरपालिका .जिल्हा परिषद. नगरपालिका पंचायत समिती चा निवडणुकीसाठी तयारी लागा व कामाला लागा असे आवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी म्हटले आहे.तरी यांच्या आदेशाची अंमलबजावणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी करावी अशी विनंती आमदार इद्रीस भाई नायकवडी यांनी केली आहे

# शेतातील झुकलेल्या विद्युत पोलची दुरुस्ती करावी

प्रवीण उंबरकर
वाशीम प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



वाशीम तालुक्यात शेतकरी नेते राम इढोळे यांची मागणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी अंतर्गत येत असलेल्या सर्व ११ के. व्ही. च्या व एल टी च्या ताराला टाईटपणा देऊन तार ओढून घ्यावे तर झुकलेले पोल सरळ करण्यात यावेत. काही ठिकाणी ११ के.व्ही. चे पोल तर काही ठिकाणी एल टी लाईनचे पोल झुकलेले आहेत. अशा अनेक शेती भागातील शेतकऱ्यांच्या हितासाठी हिवाळी हंगामा अगोदर ही कामे करणे गरजेचे आहे जर हे कामे रिकाम्या वेळात व होईल त्यावेळी केल्या गेले तर शेतकऱ्यांना हिवाळी हंगामात त्रास होणार नाही. हिवाळी हंगामात पेरलेल्या पिकाला विद्युत वितरण कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी शेतकऱ्यांना आशा आहे.

कोणतेही काम वेळेत होत नाही, त्या अगोदरच ही कामे केली तर शेतकऱ्यांना कायम दिलासा मिळेल व या केलेल्या कामामधून शेतकऱ्याचे हितच जोपासल्या जाईल. याबाबतचे सर्व आढावे/माहिती आपल्या विद्युत तंत्रज्ञा कडून सर्व माहिती घेऊन पूर्ण करावेत अशी आशा वाशीम तालुक्यातील शेतकरी नेते राम इढोळे व सर्व शेतकऱ्यांना आहे.

# मुक्रमाबाद परीसरातील गोजेगाव येथे वादळीवाऱ्यामुळे, पिकांचे नुकसान

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------





मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरातील गोजेगाव येथे वादळीवाऱ्यामुळे मृग नक्षत्राच्या पहील्याच पावसाने झोडपून काढले होते.८जानेवारी रोजी रात्री ३ वाजताच्या सुमारास वादळीवाऱ्यासह मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची केळीची बाग जमीनदोस्त झाली आहे. मृग नक्षत्राच्या पावसाचा तडाखा केळी, पिकांवर बसला आहे. वाऱ्यामुळे केळीच्या फड आडवे झाले तर काढणीस आलेल्या केळीच्या बागेतील झाडे उन्मळून गोजेगाव परीसरातील शेतकऱ्यांची पडले आहेत. ज्या केळीची वाढ झाली आहे व फळधारणा झाली आहे.अशी झाडे आडवी झाली आहे. या शेतकऱ्यांनी अनेक संकटातून जमवलेल्या केळीच्या बागाला वाऱ्याचा मोठा फटका बसला शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मृग नक्षत्राच्या पाऊस पडावा अशी सर्वांची भावना होती ती पूर्ण झाली.पण सोबत वारा आल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. मृग नक्षत्राच्या पहिल्याच संततधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. केळीच्या बागा जतन व संवर्धन करण्यासाठी शेतकऱ्यांना दिवस - रात्र परिश्रम घ्यावे लागत आहे. यंदाच्या वर्षी उन्हाळ्यात तापमान मोठ्या प्रमाणात होता. तरीही शेतकरी संकटात केळीच्या बागायती पिके घेतली आहे. तर केळीच्या बागेतून पैसे मिळतील अशी आशा होती.पण मृग नक्षत्राच्या पहिल्या पाऊसमुळे केळीचे झाडे आडवे झाली आहे. दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना केळीच्या बागायती शेतकऱ्यांना या वादळीवाऱ्याने आणखी भर पडली आहे. मुक्रमाबाद, गोजेगाव, इटग्याळ, परतपुर, देगाव, रावी,वंडगीर येथे देवकत्ते यांचे घराचे भींत कोसळले तर रावणकोळा आदी परिसरात या वादळीवाऱ्याचा मोठा फटका बसला आहे. केळी, भाजीपाला लागवड करणाऱ्या आदी पिकांचे नुकसानीचा फटका बसला असून शेतकऱ्यांची मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. गोजेगाव येथील गट क्रमांक ५२० मध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकरी महादेव मल्लिकार्जुन पंचडे या शेतकऱ्यांचे बागायती जमीनदोस्त झाली आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी मुखेडचे तहसीलदार राजेश जाधव, तालुका कृषी अधिकारी, तलाठी शेख, सरपंच दिगाबंर पाटील गोजेगावकर, यांनी पंचनामा केला आहे.तरी वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांनी तात्काळ मदत करावी अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

# वडाचे झाड लावून वटपौर्णिमा साजरी

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------





रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या वतीने वटपौर्णिमा ,रामलिंग येथे दरवर्षी प्रमाणे वडाचे झाड लावून साजरी करण्यात आली. वटपौर्णिमा हा सण सर्व ठिकाणी आनंदात स्त्रिया साजरा करतात, वडाची झाडाची पुजा करून ,पतीचा दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात .वडाचे खूप महत्त्व आहे .वडाचे झाड केवळ धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टीनेच नाही, तर वैज्ञानिक दृष्टीनेही महत्त्वाचे आहे.त्याचे औषधी गुणधर्म आणि पर्यावरणातील महत्व यामुळे ते एक अद्वितीय वृक्ष मानले जाते.आज आपल्याला जगण्यासाठी लागणारा ऑक्सिजन या झाडापासून मिळतो .कोरोना मध्ये याचे महत्व सर्वांना समजलेच आहे. म्हणूनच पुढचा पिढीसाठी प्राणवायू मिळण्यासाठी प्रत्येक स्त्री ने वटपौर्णिमा या दिवशी वडाचे एक झाड लावून ते वाढवले पाहिजे, तेव्हा खऱ्या अर्थाने ती वटपौर्णिमा साजरी होईल. आज रामलिंग येथे महिलांनी वडाचे झाड लावून वटपौर्णिमा साजरी केली.यावेळी ग्रा.सदस्य लीलाबाई दौंडकर , ग्रा.सदस्य लता इसवे,

ग्रा.सदस्य - यशोधा दसगुडे, तांबे मॅडम,dr. स्मिता कवाद, गीता आढाव, छाया अल्हाड,अर्चना कर्डिले, माया रेपाळे,छाया जगदाळे, राधा रेपाळे, कविता करंजुले, रुपाली बोर्डे, अँटी लोंढे अनेक महिला उपस्थित होत्या. सर्वांचे आभार रामलिंग महिला उन्नती बहु सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा - राणी कर्डिले यांनी मानले.

# स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी सत्कार, रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी व सत्कार सोहळा कार्यक्रम संपन्न

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



दिनांक ११ जून २०२५ ला प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे संपादक , जनता टाईम/ जटा टीव्ही चे प्रतिनिधी संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसाचे औचित साधून सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत जे विविध सामाजिक क्षेत्रात काम करतात व त्यांच्या कार्याची दखल कुठेतरी व्हावी व त्यांना त्यांच्या कार्याचा मान सन्मान व्हावा या उदात्त हेतूने कार्यक्रमाचे आयोजन पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे करण्यात आले होते .वाढदिवस हे फक्त नाममात्र निमित्त होते. परंतु तळागाळातील कार्यकर्त्यांना त्यांच्या कार्याची पावती म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांचे उपस्थितीत महाकारूणी तथागत गौतम बुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिक्षण महर्षी महात्मा ज्योतिबा फुले ,आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज, यांना सर्वप्रथम अभिवादन करण्यात आले. त्यानंतर सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रबोधनकार भावेश कोटांगले यांनी पत्रकार संजीव भांबोरे यांच्यावर आधारित गीत सादर केले .त्यानंतर ४ वाजता राज्यस्तरीय घेण्यात आलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम अंकित वसंता लोंदासे , द्वितीय दुर्गेश विलास लोंदासे, तृतीय सुमेध खुशाल खोपे ,विद्यार्थ्यांचा अनुक्रमे १००१, ७०१ ,५०१ ,रुपये , सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ व मानाचा फेटा बांधून मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सत्कारमूर्ती पत्रकार संजीव भांबोरे यांचा दैनिक माझा मराठवाडा चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर यांनी भव्य दिव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला, जनता टाईम /जटा टीवी चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे यांनी भव्यदिव्य तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा भेट देऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला .सरपंच शिवशंकर मुंगाटे यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. प्रेस संपादक पत्रकार सेवा संघटनेचे भंडारा जिल्हा अध्यक्ष

**माजी खासदार खुशाल बोपचे ,मुख्य संपादक दैनिक माझा मराठवाडा दशरथ सुरडकर ,जटा टीव्ही चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे ,सरपंच शिवशंकर मुंगाटे आवर्जून उपस्थित**

**सन्मान द्या आणि सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यस्तरीय ऑफलाईन स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी सत्कार, रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी व विविध सामाजिक क्षेत्रातील ७६ कार्यकर्त्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम संपन्न**

आशिष चेडगे ,व भंडारा जिल्हा प्रभारी डॉ.अक्षय कहालकर ,उपाध्यक्ष सुरज गोंडाने, पत्रकार ऋग्वेद येवले यांच्या वतीने सन्मानचिन्ह , गुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. अभय रंगारी सामाजिक कार्यकर्ते यांच्यावतीने सुद्धा पुष्पगुच्छ सन्मानपत्र, सन्मान चिन्ह ,देऊन सत्कार करण्यात आले.सामाजिक कार्यकर्ते सदानंद धारगावे यांनी सुद्धा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तिरुपती गिफ्ट एम्पोरियम भंडारा यांनी सुद्धा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित केले .त्याचप्रमाणे विविध सामाजिक क्षेत्रातील कवी , लेखक , साहित्यिक, पत्रकार ,प्रबोधनकार , डॉक्टर , सामाजिक कार्यकर्ते यांचा सन्मानचिन्ह, सन्मान प्रमाणपत्र, मानाचा फेटा व पुष्पगुच्छ देऊन व भारताचे संविधान मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. त्यात प्रामुख्याने माजी खासदार खुशाल बोपचे, दैनिक माझा मराठवाडा विभागीय संपादक दसरथ सुरडकर, मराठवाडा विभागीय संपादक गोकुळ सिंग राजपूत, कार्यकारी संपादक संजय दांडगे, परशुराम दिघोरे, प्राध्यापक राजेश नंदपुरे, शंकर भेंडारकर, विजयकुमार डहाट, सदानंद धारगावे ,अमरकंठ समरीत, अभय रंगारी, रोशन जांभुळकर, लोकनाथ रायपुरे, पंकज वानखेडे , ,डॉ. अक्षय कहालकर ,गणेश पारधी, जीवन बोधी बौद्ध, डॉ.गणेश मेश्राम, प्राध्यापक अशोक वाहने , सरपंच शिवशंकर मुंगाटे, पत्रकार आशिष चेंडगे, प्रबोधनकार भावेश कोटांगले ,प्राध्यापक राहुल डोंगरे ,पत्रकार ऋग्वेद येवले , ,भीमराव टेंभुर्णे , मनोज चिचगरे , विजय नंदागवळी, सतीश सोमकुवर, सुनील सूर्यवंशी, कुलदीप गंधे, कवी नाशिक चवरे, पत्रकार शशिकांत भोयर, विलास बांडेबुचे, गुलाब घोडसे, अर्पित मेश्राम , विनय ढोके , विकास टेंभुर्णे ,अमोल थुलकर ,सोहेल खान , मुनेश्वर बोदलकर , प्रेमसागर गजभिये , विजय खोब्रागडे, अशा विविध सामाजिक क्षेत्रातील ७६ कार्यकर्त्यांचा माजी खासदार तथा अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष खुशाल बोपचे ,दैनिक माझा मराठवाड्याचे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,जनता टाईम/जटा टीव्ही चे मुख्य संपादक निखिलेश कांबळे, अड्याळ येथील सरपंच शिवशंकर मुंगाटे,संविधान संघर्ष समिती चे भंडारा जिल्हा अध्यक्ष रोशन जांभुळकर , साहित्यिक अमृत बनसोड, शांतीवन बुद्ध विहाराचे संचालक जीवनबोधी बौद्ध ,सत्कारमूर्ती प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा संपादक, त्याचप्रमाणे जनता टाईम /जनता टीव्हीचे प्रतिनिधी संजीव भांबोरे , दैनिक माझा मराठवाडा कार्यकारी संपादक संजय दांडगे, दैनिक माझा मराठवाडा विभागीय संपादक गोकुळ सिंग राजपूत, यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आले . यावेळी वाढदिवसानिमित्त समर्पण ब्लड बँक भंडारा यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे नेत्रसेवा हॉस्पिटल भंडारा यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला महिला व युवक यांनी सहकार्य करून आपला सहभाग नोंदविला. त्याचप्रमाणे राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना सन्मान प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. त्याचं प्रमाणे सर्व सत्कार मूर्तींना जेवणाची सुद्धा सुविधा करण्यात आली होती.आपलाही स्पर्धेत कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक राजेश नंदपुरे यांनी केले तर सर्व मान्यवरांचे आभार प्रबोधनकार भावे कोटांगले यांनी मानले .रक्तदान शिबिर यशस्वी करण्याकरता अर्पित मेश्राम व संदीप नवले यांच्या टीमने उत्कृष्ट सहकार्य केले .त्याचप्रमाणे पंकज वानखेडे,आशिष मेश्राम , प्रमोद वासनिक, अंबादास मेश्राम यांनी मोलाचे सहकार्य केले.

# धुळे जिल्हाला "ड" प्लस दर्जा देण्याची आमदार अनुप अग्रवाल यांची मागणी

## उद्योग मंत्री उदय सामंत यांना दिले निवेदन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



राज्य शासनाच्या प्रस्तावित नवीन औद्योगिक धोरणामध्ये धुळे जिल्ह्याला 'ड प्लस' दर्जा देण्यात यावा, अशी आग्रही मागणी धुळे शहराचे आमदार अनुप अग्रवाल यांनी आज दि. १० जून रोजी राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे सविस्तर निवेदनाद्वारे केली. औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या धुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी ही मागणी अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

धुळे जिल्ह्याची सद्यःस्थिती मांडताना आमदार अग्रवाल म्हणाले की, "जळगाव, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर यांसारख्या शेजारील जिल्ह्यांनी औद्योगिक क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे, मात्र धुळे जिल्हा अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिला आहे." त्यामुळे रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि औद्योगिक संधींमध्ये धुळे मागे पडत आहे. सध्या धुळे जिल्ह्यात अक्कलपाडा प्रकल्प, सुलवाडे-जामफळ-कनोली प्रकल्प यांसारख्या जलसिंचन योजनांमुळे पाणीपुरवठ्याची समस्या दूर झाली आहे. सात राष्ट्रीय महामार्गांचे जाळे, धुळे-नरडाणा रेल्वेमार्गाची प्रगती, तसेच दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर प्रकल्पांतर्गत धुळ्याची निवड ही औद्योगिक विकासासाठी उपयुक्त संधी ठरू शकते.

धुळे जिल्ह्याला प्रस्तावित धोरणात 'ड प्लस' दर्जा द्यावा, सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेल्या उद्योगांना सवलती द्याव्यात, इमर्जिंग आणि एस्पार्लेशन क्षेत्रातील गुंतवणुकीला १२० टक्के प्रोत्साहन, SGST सवलत, व्याजसूट, अशा विविध लाभांचा समावेश व्हावा, अशी विनंती आमदार अग्रवाल यांनी केली. या मागण्यांवर प्रतिसाद देताना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी धुळे जिल्ह्याला 'ड प्लस' दर्जा देण्यासाठी शासन सकारात्मक आहे आणि या दिशेने आवश्यक ती पावले उचलली जातील, असे आश्वासन आमदार अनुप अग्रवाल यांना दिले. तसेच इतर मागण्यांवरही सकारात्मक विचार केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

# सेवानिवृत्त मु. अ. विठ्ठलराव वाघजी भायेगावे अंबुलगेकर गुरुजी यांचे निधन!

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------



स्वर्गीय विठ्ठलराव भायेगावे

अंबुलगा बुद्रुक येथील रहिवासी तथा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे निवृत्त मुख्याध्यापक श्री विठ्ठलराव वाघजी भायेगावे वय वर्ष ७७ यांचे आज अल्पशा आजाराने निधन झाले. गुरुजी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, जावई, नातू नातवंडे असा मोठा परिवार आहे. उद्या दिनांक १२ जून गुरुवार रोजी सकाळी ११ वाजता अंबुलगा ता.मुखेड जि.नांदेड येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत अशी माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली. जिल्हा परिषद शिक्षण विभाग पतसंस्थेचे संचालक तथा शिक्षक सेनेचे जिल्हाध्यक्ष श्री संतोष विठ्ठलराव आंबुलगेकर यांचे वडील तर सामाजिक न्याय विभागाचे अधिक्षक श्री गणेशराव भायेगावकर व दिलीप कदम माकणीकर व प्रहार न्यायमंच आश्रम शाळा शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष आनंद पाटील नकाते यांचे ते सासरे होत.

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज रत्न पुरस्काराने सन्मानित

राज रावणवकर
हडपसर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------




महाराष्ट्र शासनाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नेते तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे मराठवाडा उपाध्यक्ष चंद्रकांत ठाणेकर यांना देताना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाठ,महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी मंत्री भरतजी गोगावले, जलसंधारण मंत्री संजयजी राठोड, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे व सोबत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे युवा नांदेड जिल्हाध्यक्ष ॲड.प्रकाश ठाणेकर व आदी...

# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामानशास्त्र केंद्राने दिल्या सूचना; ११ ते १५ जून पाच दिवस यॅलो अलर्ट जारी

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------

प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र मुंबई यांनी ११ जून २०२५ रोजी दुपारी दिलेल्या सूचनेनुसार नांदेड जिल्ह्यासाठी ११ जून २०२५ ते १५ जून २०२५ या पाच दिवसासाठी यलो (Yellow) अलर्ट जारी केलेला आहे. दि. ११ ते १३ जून २०२५ हे तीन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह मुसळधार पाऊस व १४ व १५ जून २०२५ हे दोन दिवस जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ४० ते ५० किमी वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह व ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची अधिक शक्यता वर्तविली आहे. या नैसर्गिक आपत्ती संदर्भात सर्व संबंधित यंत्रणा आणि जनतेने खबरदारी घ्यावी. नागरिकांनी खबरदारीची उपाययोजना म्हणून पुढील प्रमाणे काळजी घ्यावी. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### या गोष्टी करा

विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्यास बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका. आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर त्या वस्तू त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तात्काळ पाण्यातून बाहेर पडा. तुमच्या स्मार्ट मोबाईल फोन मध्ये 'दामिनी', 'सचेत' हे दोन ॲप डाउनलोड करा 'दामिनी' ॲप तुमच्या आजूबाजूला वीज विषयक संभाव्य धोके दर्शविते तर 'सचेत' ॲप मुळे तुम्हाला तुमच्या आजूबाजूच्या हवामानाविषयी अचूक इशारे व माहिती मिळते.

### या गोष्टी करु नका

आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाईन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाईपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वटवृक्ष लावून, सुवासिनींना ग्रंथ भेट देत वटपौर्णिमेच्या दिल्या शुभेच्छा!

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

---------------------






गोरेगाव पोलीस स्टेशन परिसरात गुरूदेव युवा मंच, महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना समिती व महिला मंच गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने वटपौर्णिमा हा सण आगळयावेगळया उपक्रमाने साजरा करण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत उपस्थित सुवासिनींना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे प्रेरणादायी जीवनचरित्र देऊन त्यांच्या सामाजिक कार्याची जाणीव करून देण्यात आली. तसेच वटवृक्षाचे रोप लावून पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेशही देण्यात आला. उपस्थित मान्यवरांमध्ये पोलीस निरीक्षक पिपलेवार साहेब, पिएसआय घोलप साहेब, पोलीस विभागातील इतर कर्मचारी, तसेच संघटना पदाधिकारी – जिल्हाध्यक्ष हरिराम येळणे गुरूजी, गुरूदेव युवा मंच जिल्हाध्यक्ष उमराव डोलारे, महिला मंच उपाध्यक्षा सौ. संगीता घासले, सौ. लिनता लोखंडे, सौ. जयस्वाल भाभी, सौ. अनिता कटरे, सौ. वैशाली काठेवार, सौ. तुरकर भाभी व अनेक सजग सुवासिनी उपस्थित होत्या. सणाच्या निमित्ताने स्त्री शक्तीला वंदन करत, पर्यावरणपूरक वृक्षारोपण व समाजप्रबोधनाचे सुंदर उदाहरण या उपक्रमातून सादर झाले.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# PASSWORD PROTECTED PAGE